यशवंत लातूर

# जि. प. कन्या प्रशाला, पानचिंचोली येथे सायबर जनजागृती अभियान उत्साहात




लातूर : क्लिक हील फाउंडेशनच्या वतीने राजर्षी शाहू कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८.०० ते ९.३० वाजेपर्यंत जि. प. कन्या प्रशाला, पानचिंचोली येथे सायबर जनजागृती सत्राचे आयोजन केले. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना वाढत्या सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक माहिती व मार्गदर्शन देण्यात आले.

या सत्रात सायबर वॉरियर १ साबने पायल आणि सायबर वॉरियर २ सृष्टी पाटील यांनी विद्यार्थ्यांना सायबर फसवणूक कशाप्रकारे घडते, फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, मोबाईलमधील विविध प्सना परवानगी देताना कोणती काळजी घ्यावी तसेच मजबूत पासवर्ड कसा तयार करावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांना केवळ माहिती देण्यावर भर न देता, दैनंदिन जीवनात या सायबर सुरक्षा उपायांची अंमलबजावणी कशी करावी, याचेही मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेबाबत अधिक जागरूक होऊन सुरक्षित डिजिटल वापराचे महत्त्व समजून घेतले. या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक साबने सर यांनी विशेष सहकार्य केले. त्यांनी कार्यक्रमासाठी आवश्यक परवानगी देऊन आयोजकांना सहकार्य केले तसेच सायबर जनजागृती उपक्रम यशस्वी होण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करून त्यांना सुरक्षित आणि जबाबदार डिजिटल नागरिक बनविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले हे सत्र अत्यंत उपयुक्त ठरले.